# निवड समिती जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,हिंगोली

## जाहिरात क्रमांक 01 दिनांक दि. 03/10/2016

जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, **हिंगोली** च्या आस्थापनेवरील संगणक प्रोग्रामर हे पद कंत्राटी तत्वावर भरणेसाठी विहीत शैक्षणिक अर्हतेनुसार उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेसाठी सुट्टीचे दिवस वगळून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित मुदतीत व सोबत दिलेल्या विहित नमुन्यात प्राप्त न झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. निवड झालेल्या उमेदवारास विहीत नमुन्यात रु. 100/- च्या बॉन्ड वर करारपत्र देणे बंधनकारक राहील. निवड झालेल्या उमेदवारास रु. 3000/- इतकी सुरक्षा ठेव जमा करावी लागेल. तसेच सदर पद कंत्राटी तत्वावर भरावयाचे असल्यामुळे सदर पदावर भविष्यात कायमपणाचा हक्क असणार नाही.

**पदाचा तपशील**

पदाचे नाव - संगणक प्रोग्रामर (कंत्राटी)

पदाचे आरक्षण - खुला प्रवर्ग

***शैक्षणिक अर्हता*** :- बॅचलर इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन (B.C.A.)

सदर पदाची मूळ अर्हता B.C.A. असली तरी उच्च अर्हता उदा. M.C.A. / B.E. (IT), B. Tech / B.E. (Computer) यांना प्राधान्य देण्यात येईल.

**संगणक प्रोग्रामर पदाचे एकत्रित मानधन :** रु. 10000/- प्रति महा.

**परिक्षा शुल्क -**

मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. 75/-

खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. 150/-

परीक्षा शुल्क **प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, हिंगोली** यांच्या नांवे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी. द्वारे अर्जासोबत द्यावे लागेल. अन्य नावाने काढलेला व राष्ट्रीयकृत बँकेतुन न काढण्यात आलेला डी.डी स्विकारले जाणार नाही.

**टीपः-** माजी सैनिक व अपंगासाठी परीक्षा शुल्क लागू नाही.

**विशेष सुचना :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन 2000/प्र.क्र.5/2001/32 दिनांक 20/7/2002 अनुषंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

1) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर, C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा
2) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्याकडील अधिकृत MS - CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र .

**वयोमर्यादा :-**

1) जाहीरातीत नमूद पदासाठी उमेदवाराचे वय अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास 18 वर्षापेक्षा कमी नसावे तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी 38 पेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारासाठी 43 पेक्षा जास्त नसावे. (अपंगासाठी व प्रकल्प ग्रस्तांसाठी 45 वर्षापर्यंत वयोमर्यादा).
2) शासन निर्णय दिनांक 27 ऑक्टोबर 2009 नुसार सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्ष अंशकालीन काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रांमध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा 46 वर्ष राहील.
3) शासन शुध्दीपत्रक साप्रवि मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ दि.20 ऑगस्ट 2010 नुसार माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणुकी करिता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्ष इतकी राहील, तसेच अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणुकीकरिता कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत राहील.
4) उमेदवारांनी परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज जिल्हा परिषद हिंगोली कडे खालील तपशिलात नमुद केलेल्या दिनांकास सायंकाळी 5.30 वाजेपर्यत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रत्यक्ष अथवा पोष्टाने पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
5) सदर अर्ज स्विकारण्याचा दिनांक, प्रवेश पत्र वितरणाचा दिनांक, परिक्षेचा दिनांक खालील प्रमाणे आहे. उमेदवारांना प्रवेशपत्र पोष्टाव्दारे पाठविले जातील. पोष्टाने मिळण्यास विलंब झाल्यास त्यास निवड समिती जवाबदार राहणार नाही.

## तपशिल

| अ.क्र | पदाचे नांव | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | प्रवेश पत्र वितरणाचा दिनांक | परिक्षेचा दिनांक | परिक्षेची वेळ | अर्ज सादर करावयाचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संगणक प्रोग्रामर | 13.10.2016 | 19.10.2016 | 26.10.2016 | सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 | प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, हिंगोली |

**सर्वसाधारण सुचना :-**

1) राष्ट्रीयत्व - भारतीय
2) उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक).
3) उमेदवाराने विहित नमून्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटो वर राजपत्रित अधिकारी यांची स्वाक्षरी घ्यावी. अन्यथा फोटो व त्यावर स्वाक्षरी नसलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.
4) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला/वैधता प्रमाणपत्र इत्यादीच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.
5) शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.
6) शासन परिपत्रक दिनांक 5 जून 2006 नुसार अनुसुचित जाती व जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2015-2016 चे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
7) महिला आरक्षणाबाबत महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय दिनांक 25 मे 2001 मधील तरतूदीनुसार क्रिमीलेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे.
8) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि. 28/03/2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9) एखादा उमेदवार त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
10) लेखी परिक्षेत गुणानुक्रमे गुणवत्ता यादी मध्ये अंतर्भव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणाच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
11) **परीक्षेचे स्वरुप :-** लेखी परिक्षेचे गुणाचा तपशील खालील प्रमाणे राहील व व्यावसायीक चाचणी 80 गुणांची असेल.

| अ.क्र | पदाचे नाव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बौध्दिक चाचणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| 1 | संगणक प्रोग्रामर | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 |

12) नैसर्गिक आपत्तीमुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल.
13) अर्जासोबत सर्व संबधित कागदपत्राच्या छायाकिंत प्रती साक्षाकिंत करुन जोडने आवश्यक आहे. विहित नमुन्यात नसलेला, अपुर्ण भरलेला, आवश्यक कागदपत्रे न जोडलेला, डिमांड ड्राफट न जोडलेला अर्ज अपात्र करण्यात येईल.
14) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याहि क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जा सोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
15) पात्र/अपात्र उमेदवारांच्या याद्या जिल्हा परिषद हिंगोलीच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येतील. वेगळयाने कळविले जाणार नाही.
16) नियुक्ती दिलेल्या उमेदवारास हिंगोली जिल्ह्यात कोठेही नेमुन दिलेल्या ठिकाणी काम करावे लागेल. तसेच वेळोवळी आवश्यकते नूसार सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.
17) अर्जाचा नमुना www.hingoli.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**सदस्य सचिव**
**निवड समिती, जिग्राविय, हिंगोली तथा**
प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, हिंगोली

**अध्यक्ष**
**निवड समिती जिग्राविय, हिंगोली तथा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, हिंगोली

*C:\Documents and Settings\Administrator\Desktop\Bharti\Advertisement 2016.doc*

**अर्जाचा नमुना**
**जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, हिंगोली**
**कंत्राटी भरती सन 2016**

प्रति,

सदस्य सचिव,
निवड समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हिंगोली तथा,
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, हिंगोली

| येथे उमेदवाराने हल्लीचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो चिकटवून साक्षांकित करावा |
|---|

**विषय - संगणक प्रोग्रामर या पदासाठी अर्ज सादर करणे बाबत.**

1) संपुर्ण नांव ............................................................
आडनाव ..................................................
वडीलाचे /पतीचे नांव ................................................................................

2) पत्रव्यवहाराचा पता (पीनकोडसह ) घर.क्र.वार्ड क्र...................................................
इत्यादी.......................................गाव................................ पोष्ट..........................
ता...........................................जिल्हा.......................................
पीनकोड....................................मोबाईल नंबर..............................
असल्यास ईमेल आय.डि...........................................

3) अर्जदार कोंणत्या प्रवर्गाचा आहे. खालील लागु असलेल्या प्रंवर्गाचा चौकोनात ( √ ) करावा.

| अनु.जाती | अनु जमाती | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

4) अ ) अर्जदार मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा..............................
ब ).अर्जदार उन्नत व प्रगत गटाबाहेरील (Non Creamylayer) आहे काय ? होय/नाही

5) अर्जदार स्त्री आहे की पुरष :- स्त्री/पुरुष

6) अर्जदार :- (1) माजी सैनिक होय/नाही
(2) स्वातंत्र्य सैनिकाचा नामनिर्देशन पाल्य होय/नाही
(3) अपंग(अस्थिव्यग/मुकबधीर/कर्णबधीर/अंध/क्षीणदृष्टी) होय/नाही
असल्यास अपंगाचा प्रकार...........................
(4) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त होय/नाही
असल्यास प्रकार..............................
(5) राष्ट्रीय खेळाडु होय/नाही
(6) अंशकालीन होय/नाही

7 ) अर्जदाराची जन्म तारीख :- अंका मध्ये (शालांत प्रमाणपत्राप्रमाणे )

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

8) अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंतचे वय

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

9) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता ( उर्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशील )

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता /पात्रता | उर्तीर्ण होण्याचे वर्षे | एकुण मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |

10) राष्ट्रीयत्व : ........................................

11) अर्जदार महाराष्ट्र राज्याचा मुळ रहिवासी आहे काय ? होय/नाही

12) डिमांड ड्रापटचा तपशिलः रु.........बँकेचे नांव..........................क्रमांक.............दिनांक.................

13) <u>अर्जासोबत खालील सांक्षाकिंत प्रति जोडाव्यात.</u>

1. जातीचे प्रमाणपत्र/वैधता प्रमाणपत्र
2. शैक्षणिक पात्रतेच्या मुळ प्रमाणपत्राच्या सांक्षाकिंत प्रति गुणपत्रिकेसह.
3. प्रकल्पग्रस्त/भुकपग्रस्त/माजी सैनिक व अंपग उमेदवारानी सक्षम अधिकायांचा दाखला (स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्याच्या बाबतीत स्वातत्र्य सैनिकाचे सन्नमानपत्र व मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात नोदविलेले पत्र माजी सैनिकाने सैन्य दलात केलेल्या सेवेचे डिस्चार्ज प्रमाणपत्र सोबत जोडावे. )
4. राष्ट्रीय खेळाडुसाठी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र
5. जन्म दिनांकासाठी टी.सी व एस.एस.सी ची सनद सांक्षाकिंत प्रत
6. उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2015-2016 या वर्षाचे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र
7. महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 28 मार्च 2005 नुसार अर्जदारास लहान कुटुब प्रतिज्ञापन विहित नमुन्यातील
8. अनुभव प्रमाणपत्र

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करित असुन याची खात्री करुनच अर्ज करित आहे. मी असेही प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळुन आल्यास नौकरी गमवण्यास व अनुषंगाने होणा-या इत्तर कार्यवाहीस पात्र व बांधील राहील व त्याबदलची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**ठिकाण :**

**दिनांक :** **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी.**

---

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्र नमुना -अ ( नियम 4 पहा )**

मी श्री/श्रीमती/कुमारी...................................................................................

श्री.........................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय............वर्षे, राहणार ..............................याव्दारे पुढिल प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

1. मी ......................... ..........................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. आज रोजी मला...............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्या पैकी दिनांक ........................ यानंतर जन्माला आलेल्या मुंलाची संख्या...........आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)
3. हयात असलेल्या मुलाची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक ............... नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-** **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी.**

**दिनांक :-**

**(टिपः- सर्व विवाहीत/अविवाहीत उमेदवारांना (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) स्वाक्षरीसह सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल)**